# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:२/एनजीसी/न.प्र.त/२०१८/ ८
दिनांक : 2 JAN 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :-१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली जाहिरात क्रमांक ॲप्रुव्हल/१२/(३)/२०१७
२) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/२०१८/८, दि. ०२.०१.२०१८
३) या संचालनालयाने वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक २/ /एनजीसी/ मान्यता/२०१८/१, दि. ०२.०१.२०१८

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/१२(३)/२०१७] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१८-१९ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) विनियम, २०१६ व पहिली दुरस्ती, २०१७ नुसार ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०१.०१.२०१८ ते दि. ३१.०१.२०१८ पर्यंत व विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१८-१९ च्या तरतूदींनुसार) दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५.०२.२०१८ हा निर्धारीत केला आहे. त्यासअनुसरुन संचालनालय स्तरावरुन संदर्भ क्रमांक २ व ३ च्या जाहिर सूचना प्रसिध्द केल्या असून त्या आपणांस अग्रेषित केलेल्या आहेत. याबाबत आपल्या स्तरावरुन विनाविलंब खालील कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेस अनुसरून संदर्भ क्रमांक २ व ३ च्या अधिसूचनेतील निर्देश आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थाना आपले स्तरावरुन देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी दि. २३.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क जमा करण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तूकला परिषदेकडे पाठविण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

३. सदर्भ क्रमांक २ च्या जाहिर सूचनेतील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद अर्ज ज्या संस्थांनी AICTE कडे अर्ज केले असतील अशा संस्थाना सदर प्रस्तावाच्या प्रतीसह आपल्या कार्यालयास संपर्कासाठी सूचित केले आहे. याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने दि. २३.०५.२०१७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थेने नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क घेऊन आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी.

सदर सा... मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी किं... उपयोजित यंत्रशास्त्र व आर्किटे... विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात यावा व सदर समितीने AICTE च्या मानकाप्रमाणे जमीनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदरहरणार्थ ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट, ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट, बांधकाम प्रमाणपत्र, कौन्सील ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टर आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले नकाशे, बांधकामाचे मोजमाप इत्यादी सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करण्यात यावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा AICTE ने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीताच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक / वास्तुकला परिषदेने निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करण्यात यावी. आपलेकडे प्राप्त झालेल्या अर्जांची जसजशी तपासणी होईल त्याप्रमाणे तपासणी समितीचा अहवाल व त्यावर आपले अभिप्रायाची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील लिंक वर ऑनलाईन पध्दतीने विभागीय कार्यालयाच Login मधून अपलोड करण्यात यावेत.

४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थाना आपल्याकडे जमा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त प्रस्तावांना पोच देऊन सदर प्रस्ताव आपल्या स्तरावर जतन करण्यात यावेत.

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदने निर्धारीत केलेल्या संबंधित प्रस्तावांबाबते शासनाचे अभिप्राय AICTE कडे पाठविण्याबाबतचा कालावधी अल्प असल्यामुळे प्राप्त होणा-या सर्व प्रस्तावांची शिफारस टप्प्याटप्याने शासनास पाठविण्याचे नियोजित आहे. सबब आपल्या कार्यालयाकडे प्राप्त होणा-या अर्जाच्या अनुषंगाने परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केल्यानूसार. आपले स्तरावरुन कार्यवाही झाल्यानंतर संबंधित संस्थेचा प्रस्ताव, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ठ अभिप्रायासह खालील नमूद केलेल्या कालमर्यादेत या कार्यालयास निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावेत.

| अ.क्र. | प्रस्ताव / अर्ज प्राप्त झाल्याचा कालावधी | रकाना क्र.२ मध्ये नमूद प्रस्ताव तपासणी अहवालासह संचालनालयास सादर करावयाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | दि. ०१ ते १० जानेवारी, २०१८ | दि. १२ जानेवारी, २०१८ |
| २ | दि. ११ ते २० जानेवारी, २०१८ | दि. २२ जानेवारी, २०१८ |
| ३ | दि. २१ ते ३१ जानेवारी, २०१८ | दि. ०२ फेबुवारी, २०१८ |

वरील तक्त्यातील रकाना क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास खास दुतामार्फत या संचालनालयास संबधित संस्थेचा अर्ज, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ठ अभिप्रायासह निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावेत अन्यथा AICTE कडे आपल्यामार्फत विहित कालमर्यादेत प्रस्ताव प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव शिफारशी पाठविण्यास उशीर झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे मान्यता प्रक्रीयेचे काम विहित मुदतींत पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधित संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावर सबंधितांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१८/ ३६
दिनांक :- 4 JAN 2018

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत संचालनालयाच्या परिपत्रकात नमुद केल्यानुसार ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०१/०१/२०१८ ते दि.३१/०१/२०१८ पर्यंत व विद्यामान संस्थांसाठी (एपीएच २०१८-१९ च्या तरतूदींनुसार) दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यासाठी ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५/०२/२०१८ हा निर्धारीत केला आहे. तरी संबंधीत संस्थांनी वरील परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.